# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.09.2025** **वारःमंगळवार**

---

1. बिहार, पश्चिम बंगाल आणि आसाममधून घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही
2. अंमली पदार्थ विरोधी कृती दलाच्या राष्ट्रीय परिषदेचं आज् केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन
3. प्राप्तिकर विवरणपत्र भरण्याकरता एका दिवसाची मुदतवाढ आणि
4. बुद्धीबळपटू वैशाली रमेशबाबू हिला फिडे ग्रँड स्विस स्पर्धेचं विजेतेपद

**<u>पंतप्रधान</u>**

बिहार, पश्चिम बंगाल आणि आसाम या राज्यांमधून घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी रालोआ सरकार वचनबद्ध आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. बिहारमधल्या पूर्णिया इथं पूर्णिया विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचं उद्घाटन मोदी यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते 40 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. राष्ट्रीय मखाणा मंडळाचं लोकार्पणही त्यांनी केलं. जीएसटी सुधारणांचाही त्यांनी उल्लेख केला.

**<u>अमित शहा-अमली पदार्थ विरोधी मोहीम</u>**

अंमली पदार्थ विरोधी कृतीदलाच्या राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रमुखांच्या दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन आज नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अंमली पदार्थमुक्त भारताच्या वचनबद्धतेला बळकटी देण्यासाठी आणि हे ध्येय साध्य करण्यासाठी एक आराखडा तयार करण्यासाठी ही परिषद एक धोरणात्मक व्यासपीठ म्हणून काम करेल, असं अमलीपदार्थ नियंत्रण आयोगानं म्हटलं आहे. या दोन दिवसीय परिषदेत देशातील अमली पदार्थांच्या धोक्याशी लढण्यासाठी सर्व संबंधित घटकांनी केलेल्या सामूहिक प्रयत्नांचा व्यापक आढावा घेतला जाईल आणि भविष्यातील कृती आराखड्यावर चर्चा केली जाईल. अमलीपदार्थ नष्ट करण्याची मोहिमेचीही ऑनलाइन सुरुवातही यावेळी करण्यात येणार आहे. यावेळी 794 कोटी रुपयांचे अमली पदार्थ नष्ट करण्यात येतील, असं अमित शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>सीबीडीटी मुदत वाढ</u>**

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं 2025-26 या वर्षासाठी प्राप्तिकर विवरणपत्र भरण्याची काल संपणारी अंतिम मुदत आज एका दिवसानं वाढवली आहे. काल रात्री उशिरा समाजमाध्यमाद्वारे करविभागानं ही माहिती दिली. विवरणपत्र दाखल करण्याची मूळ अंतिम तारीख 31 जुलै होती, जी 15 सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली होती. मात्र, पोर्टलवर अडचणी येत असल्याच्या तक्रारी आल्यानं आणि मुदतवाढीची मागणी होत असल्यानं ही मुदतवाढ देण्यात आली. दरम्यान, करनिर्धारण वर्ष 2025-26 साठी कालच्या अंतिम मुदतीपूर्वी सात कोटींहून अधिक प्राप्तिकर विवरणपत्र दाखल झाल्याचं काल करविभागानं जाहीर केलं आहे.

**<u>सेवा पर्व-स्वच्छतोत्सव</u>**

स्वच्छता ही सेवा या अभियानाला उद्यापासून म्हणजेच 17 सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. हे अभियान यंदा स्वच्छतोत्सव म्हणून साजरा होणार असल्याची माहिती शहर कल्याण मंत्री मनोहर लाल यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. या अभियानादरम्यान देशभर मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहिमा आणि श्रमदान होणार असल्यांचीह त्यांनी सांगितलं. 25 सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीदिनी देशव्यापी एक दिवस, एकसाथ, एक तास श्रमदान कार्यक्रम राबवणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>सेवा पर्व-सौरउर्जा</u>**

सेवा आणि सुशासन हा मंत्र जपत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार सर्वसमावेशक प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. सौरउर्जेमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर मोदी सरकारनं भारताला आघाडीचं स्थान मिळवून दिलं आहे. हवामानविषयक

उपाययोजनांपासून ते हरित ऊर्जेपर्यंत, भारतानं राष्ट्रीय हिताला प्राधान्य देऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा घडवून आणल्या. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात हे प्रयत्न अत्यंत जबाबदारीनं आणि सर्वसमावेशक पद्धतीनं हाताळण्यात आले. आंतरराष्ट्रीय सौर आघाडी म्हणजे आयएसएद्वारे राबवण्यात आलेल्या हवामान कृती आराखड्यामध्ये हे काम अतिशय प्रभावीरित्या प्रतिबिंबित झालेलं दिसतं.

**जीएसटी कृषी**

वस्तू आणि सेवा करांमध्ये सरकारने केलेल्या सुधारणांमध्ये कृषी क्षेत्रासाठीच्या करातही बरीच कपात करण्यात आली आहे. ट्रॅक्टर आणि ट्रॅक्टरशी निगडीत साधनांवरचा वस्तू आणि सेवा कर पाच टक्क्यांवर आणण्यात आला आहे. जैव कीटकनाशकं, सूक्ष्म खतं, सिंचन उपकरणं तसेच शेतीसाठी लागणाऱ्या विविध अवजारांवरचा जीएसटी 12 टक्क्यांवरुन कमी करुन पाच टक्के करण्यात आला आहे. या बदलांचा शेतकऱ्यांना आणि कृषी क्षेत्राला फायदा होईल असं केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे.

**रेल्वे तिकीट आरक्षण**

येत्या एक ऑक्टोबरपासून रेल्वेच्या तिकिटाचं आरक्षण सुरू झाल्यानंतर पहिल्या 15 मिनिटात केवळ आधार प्रमाणित वापरकर्त्यांनाच तिकीट आरक्षण करता येणार आहे. आयआरसीटीसीचे संकेतस्थळ आणि ॲपवरच नागरिकांना तिकिटाचं आरक्षण करता येणार आहे. सध्या हे निर्बंध केवळ तत्काळ तिकीट आरक्षणासाठी लागू आहेत. ते एक ऑक्टोबरपासून सर्वसाधारण तिकीटांच्या आरक्षणासाठीही लागू होतील. तिकिट खिडकीवर होणाऱ्या तिकीट आरक्षणाच्या वेळेत मात्र कोणताही बदल होणार नाही, असे रेल्वेनं स्पष्ट केलं आहे.

**जागतिक काँग्रेस**

'आम्ही समाविष्ट आहोत' या संकल्पनेवर आधारित 18व्या जागतिक समावेशन आंतरराष्ट्रीय काँग्रेसचे काल शारजाह इथं उद्घाटन झालं. पश्चिम आशिया आणि उत्तर आफ्रिका प्रदेशात पहिल्यांदाच असा जागतिक मेळावा आयोजित केला जात आहे. शारजाचे शासक शेख डॉ. सुलतान बिन मोहम्मद अल कासिमी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित ही तीन दिवसीय काँग्रेस 17 सप्टेंबरपर्यंत चालणार असून, यात 74 देशांतील 500हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. सर्वसमावेशक आरोग्यसेवा, शिक्षण, आर्थिक सहभाग, कायदेशीर हक्क आदी विषयांवर यावेळी चर्चा होणार आहे.

**जोशी-आयईसी**

भारत आता आंतरराष्ट्रीय कायदेशीर मेट्रोलॉजी संघटनेचे मान्यता प्रमाणपत्र जारी करणारा जगातील 13वा देश बनला आहे, अशी माहिती केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली आहे. काल नवी दिल्ली इथं झालेल्या 89व्या आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रोटेक्निकल कमिशन सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. देशातील महागाई दर 11 वर्षांतील सर्वांत कमी असून देशभरातील 474 केंद्रांद्वारे जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर देखरेख केली जात आहे, असंही त्यांनी सांगितलं. लवकरच राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळा आणि इस्रो यांच्या सहकार्यानं देशभरातील पाच ठिकाणांवरून अचूक भारतीय प्रमाणवेळ प्रसारित करण्यासाठी एक प्रकल्प सुरू करण्यात येणार असल्याचंही यावेळी जोशी यांनी सांगितलं.

**सीबीआय छापा**

आदिवासी कल्याण मंडळ घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयनं काल कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील 16 ठिकाणी छापे टाकले. माजी मंत्री बी. नागेंद्र यांना या प्रकरणी आधीच अटक करण्यात आली आहे. युनियन बँक ऑफ इंडियानं केलेल्या लेखी तक्रारीच्या आधारे सीबीआयनं गेल्या वर्षी जूनमध्ये हा गुन्हा दाखल केला होता.

**शबरीमला मंदिर**

केरळमधलं शबरीमला मंदिर आजपासून भाविकांसाठी खुलं करण्यात येत आहे. आज संध्याकाळी मंदिराचे दरवाजे उघडले जातील आणि उद्या सकाळपासून मासिक पूजाअर्चा सुरू होईल. 20 सप्टेंबर रोजी त्रावणकोर देवस्वम मंडळानं हीरक महोत्सवी सोहळ्यानिमित्त जागतिक अय्यप्पा संगम समारंभाचं आयोजन केलं आहे. 1 सप्टेंबर रोजी मंदिराचे दरवाजे पुन्हा बंद करण्यात येणार आहेत.

**एसएससी-सीजीएलई**

कम्बाइंड ग्रॅज्युएट लेव्हल एक्झामिनेशन (सीजीएलई) रद्द करण्यात आल्याची अफवा समाजमाध्यमांद्वारे पसरली आहे. ही अफवा असून, त्यावर विश्वास ठेवू नये, या परीक्षा देशभरात वेळापत्रकानुसार सुरळीत सुरू असल्याचं कर्मचारी निवड आयोग अर्थात एसएससीनं स्पष्ट केलं आहे. ही परीक्षा 129 शहरांमध्ये रोज तीन टप्प्यांमध्ये होत असून, ती 26 सप्टेंबरपर्यंत होणार आहे. सुमारे तीन लाख उमेदवारांनी त्यांच्या परीक्षा सुरळीतपणे दिल्या आहेत, असंही आयोगानं म्हटलं आहे.

**बुद्धीबळ**

भारतीय बुद्धीबळपटू वैशाली रमेशबाबू हिनं फिडे ग्रँड स्विस स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. तिनं अंतिम फेरीत माजी विश्वविजेती, चीनची टॅन झोंगई हिच्यावर मात केली. वैशालीचं या स्पर्धेतलं हे सलग दुसरं विजेतेपद असून, अशी कामगिरी करणारी ती पहिली बुद्धीबळपटू आहे.

**आशिया करंडक क्रिकेट**

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत ब गटातल्या सामन्यात काल श्रीलंकेनं हाँगकाँगच्या संघावर चार गडी राखून विजय मिळवला. हाँगकाँगच्या संघानं निर्धारित 20 षटकांत 4 गडी बाद 149 धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देताना श्रीलंकेच्या संघानं 19 षटकांत 6 गडी बाद 156 धावा केल्या. तर अबुधाबी झालेल्या संयुक्त अरब अमिराती आणि ओमान यांच्यातील सामन्यात संयुक्त अरब अमिरातीनं ओमानचा पराभव केला. संयुक्त अरब अमिरातीच्या संघानं 172 धावा केल्या. तर, ओमानचा डाव 18 षटकं आणि चार चेंडूत 130 धावांवर आटोपला. या स्पर्धेत आज बांग्लादेश आणि अफगाणिस्तान यांच्यात लढत होणार आहे.

**हवामान**

ईशान्येकडील राज्यं, बिहार, झारखंडसह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, विदर्भ, तसंच गोवा आणि पश्चिम बंगालमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. छत्तीसगड, पूर्व उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेशसह काही राज्यांमध्येही वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान राज्यात काल झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झालं आहे. बीड जिल्ह्यातील जवळपास सर्वच लहान मोठ्या नद्यांना पूर आले असून, अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातही काल मुसळधार पाऊस पडला.

# या बरोबरच ही राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.